## प्रकरण - 18

## नियमावली : 17

### इतर उपयुक्त माहिती

**नेहमी विचारले जाणारे प्रश्न :**

तरण तलावात प्रवेश घेण्याची पद्धती, शुल्क भरणा, तरण तलावाच्या पोहण्याच्या वेळा, कार्यालयीन कामकाजाच्या  वेळा याबाबत उपलब्ध असलेला कर्मचारी वृंद योग्य ती माहिती देतील.

**प्रशिक्षण कार्यक्रम :**

पोहण्यास न येणाऱ्या नवीन सभासदांना पोहण्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

महिला सभासदांसाठी विशेष बॅचेस आहेत. पोहण्यास येणाऱ्यांना निर्देशन शुल्कमध्ये सूट देण्यात येते. मात्र त्यांनी पोहण्याची चाचणी उत्तीर्ण केली पाहिजे. तरण तलावाचे सदस्यत्व होण्यासाठी दोन पासपोर्ट आकाराचे फोटो, मान्यता प्राप्त डॉक्टरकडून त्वचा विकार नसल्याचे वैद्यकिय प्रमाण पत्र, 16 वर्षापर्यंतच्या मुलांसाठी शाळेतून बोनाफाईड प्रमाणपत्र, वरिष्ठ नागरिकांसाठी वयाचा दाखला, महानगर पालिका कर्मचाऱ्यांसाठी सेवेचा दाखला आणणे आवश्यक आहे.

वय वर्षे 2 ते 6 पर्यंतच्या मुलांना पोहण्यास परवानगी देण्यात येते.

सभासदाबरोबर दोन पाहुणे व्यक्तीनी विहीत शुल्क भरल्यावर पोहण्यास परवानगी देण्यात येते. मात्र पाहुणे पोहणारे असायला हवे.

जे सभासद जिल्हा व राज्य स्तरावर स्पर्धेकरिता जाणार असतील त्यांचेवर विशेष लक्ष देऊन पूर्व तयारीसाठी जास्त वेळ दिला जातो.

इच्छुक सभासदांनी मागणी केल्यास पोहण्याची चाचणी घेण्यासापेक्ष प्रमाण पत्र देण्यात येते.